आदरणीय कमिशनर मॅडम,

मी आपल्या मेन ऑफिसमध्ये ज्येष्ठ नागरिक कक्षामध्ये माझ्या वृद्ध आईच्या संरक्षणासाठी अर्ज क्रमांक ६४०६ तारीख १३/७/१७ रोजी केला होता.त्यासंदर्भात मला आलेला अतिशय उत्तम अनुभव सांगण्यासाठी आणि आपल्या त्या सेक्शन मधील कर्मचाऱ्याच्या अभिनंदनासाठी मी हे पत्र लिहीत आहे.

तुमच्या ऑफिसमधील श्रीमती जयश्री जाधव, आणि श्री बोराडे हे माझ्या समवेत जवळ जवळ एक तास होते आणि त्या अवधीमध्ये त्यांनी मला खूप मोलाची माहितीदिली, मदतीचा हात पुढे केला आणि महत्वाच्या आणीबाणीच्या वेळी काय करायचे याबद्दल विवेचन केले. पोलीस खात्यामध्ये तुमच्या नेतृत्वाखाली इतकी हुशार आणि सहानुभूतीपूर्वक मदत करणारी माणसं/कर्मचारी नागरिकांसाठी आहेत याचे आम्हाला कौतुक वाटते आणि याच गोष्टीबद्दल आम्ही चौगुले कुटुंबीय तुमचे अभिनंदन करतो आणि तुमच्या या उत्कृष्ट कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो.

आपले कृपाभिलाषी,

डॉक्टर विनोद चौगुले कुटुंबीय आणि चौगुले आज्जी.
ध्रुव, पहिला मजला,
१९ लक्ष्मी सोसायटी , सेनापती बापट रस्ता,
पुणे ४११०१६